# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


अत्यंत महत्वाचे

जा.क्र.विकाऔ/शिक्षण/२०१९/ ३४८३

दिनांक : 27 NOV 2019

प्रति,

**प्राचार्य**

सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/

विना अनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,

औरंगाबाद विभाग.

विषय : **शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश मान्यतेस्तव प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या सफलता पोर्टलवर करण्याच्या प्रक्रियेबाबत. . . .**

संदर्भ १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०१९/८४९, दिनांक १८ नोव्हेंबर २०१९.

२. या कार्यालयाचे पत्र क्र. विकाऔ/शिक्षण/२०१९/३३९५ दि. २०/११/२०१९.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये झालेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या संस्थांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश मान्यता संचालनालयामार्फत करण्यांत येणार आहे. या संदर्भात राज्यातील तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असणा-या जिल्हयातील शासकीय तंत्रनिकेतने व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये यांच्या प्राचार्यांना संदर्भ क्र. २ नुसार Regional District Officer म्हणुन संचालनालयामार्फत प्रवेश मान्यता प्रक्रियेसाठी संबंधित जिल्हयातील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या संस्थांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश सफलता पोर्टलवर ऑनलाईन मान्यतेसाठी प्राधिकृत करण्यांत आलेले आहे.

या अनुषंगाने सहसंचालक वि.का. औरंगाबाद येथे विभागातर्गत येणाऱ्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या संस्थांची प्रवेश मान्यतेसाठी ऑफलाईन पध्दतीने गुणवत्ता यादी तपासणी संबंधित संस्थांना दिलेल्या वेळापत्रकानूसार पुर्ण झालेली आहे. सदर ऑफलाईन तपासणी प्रक्रियेत संस्थांच्या गुणवत्ता यादीतील त्रुटींच्या पुर्ततेसाठी संबंधित संस्थांनी यानंतर संबंधित जिल्हयातील **Regional District Officer** यांचेशी संपर्क करावा. तसेच काही विलंबामुळे सहसंचालक वि.का.औरंगबाद येथे ऑफलाईन तपासणी प्रक्रियेत सहभागी न झालेल्या संस्थांनी संबंधित जिल्हयातील **Regional District Officer** यांचेशी संपर्क करावा व ऑफलाईन व ऑनलाईन प्रक्रिया पुर्ण करावी. **प्रवेश मान्यतेची ऑफलाईन प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर संबंधित जिल्हयातील Regional District Officer यांच्या कडून संस्थांनी अंतिम ऑनलाईन प्रक्रिया पुर्ण करणे अनिवार्य आहे, याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.**

सदर प्रक्रियेसाठी सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विना अनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांनी **आपल्या जिल्हयातील संबंधीत Regional District Officer यांचेशी संपर्क करुन आपल्या संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांची अंतिम प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या सफलता पोर्टलवरील ऑनलाईन प्रक्रिया पुर्ण करावी.** जिल्हानिहाय **Regional District Officer** यांची यादी सोबत जोडलेली आहे.

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

F:\Shikshan Vibhag\Institute Letter 2019.docx

## जिल्हानिहाय **Regional District Officers** व प्रवेश मान्यता प्राधिकृत संस्थांची यादी

| अ.क्र. | जिल्हा | **Regional District Officer** चे नांव | प्राधिकृत संस्था |
|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद |
| २ | जालना | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना | शासकीय तंत्रनिकेतन, नागेवाडी, जालना |
| ३. | परभणी | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर | शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर |
| ४. | हिंगोली | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, हिंगोली | शासकीय तंत्रनिकेतन, हिंगोली |
| ५. | नांदेड | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड |
| ६. | बीड | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, बीड | शासकीय तंत्रनिकेतन, बीड |
| ७. | लातूर | प्राचार्य, पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, लातूर | पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, औसा रोड, लातूर |
| ८. | उस्मानाबाद | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद | शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद |